# अधिसूचना

क्रमांक-सेवाप्र-२०१३/प्र.क्र.१०६/आस्था-९
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२
दिनांक १० जून,२०१४

| महाराष्ट्र जिल्हा परिषदा अणि पंचायत समित्या अधिनियम, 1961 |
|---|

क्रमांक-सेवाप्र-२०१३/प्र.क्र.१०६/आस्था-९ महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ च्या महाराष्ट्र अधिनियम ५) याच्या कलम २७४,पोटकलम (२) खंड (एकोणचाळीस) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश)नियम,१९६७ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी ,उक्त कलम २७४,पोट-कलम *(३)* द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेले पुढील नियम करीत आहे.

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, (दुसरी सुधारणा ) २०१४ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ यांना जोडलेल्या परिशिष्ट- चार मधील

*(१.)* (भाग-एक) मध्ये,-

(ब) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) व्दितीय श्रेणी याच्याशी संबंधित अनुक्रमांक-२ च्या नोंदीमध्ये,

(*एक*) "पद"या शिर्षाखाली स्तंभ (३) मध्ये खालील

(*एक*) विस्तार अधिकारी (शिक्षण)

(*दोन*) सहायक शिक्षण अधिकारी (शिक्षण)

(*तीन*) वरिष्ठ सहायक शिक्षण उपनिरीक्षक

या मजकूराऐवजी " विस्तार अधिकारी ( शिक्षण ) " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

( *दोन*) " नेमणुकीकरिता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती " या शीर्षाखालील स्तंभ (*४*) मध्ये विद्यमान अर्हता व नेमणूकीच्या पध्दती याऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल.

*(१)* *(अ)* (*एक*) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३६ वर्षापेक्षा अधिक नसेल; आणि

(*दोन*) ज्यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए./बी.कॉम./बी.एस.सी. ही पदवी किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण केली असेल, आणि

(*तीन*) ज्यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड अथवा समकक्ष पदवी किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण केली असेल, आणि

(*चार*) ज्यांना मान्यताप्राप्त प्राथमिक/माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय, अध्यापक विद्यालयातील शासनमान्य पदावरील सक्षम प्राधिकाऱ्याने वैयक्तिक मान्यता दिलेला किमान तीन वर्षाच्या अध्यापनाचा किंवा प्रशासनाचा अनुभव आहे,

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने , किंवा

(*ब*) (*एक*) प्राथमिक शिक्षक किंवा माध्यमिक शिक्षक किंवा केंद्रप्रमुख किंवा मुख्याध्यापक ( प्राथमिक ) या संवर्गातील उमेदवार असतील ; आणि

(*दोन*) जे यां नियमातील खंड (*अ*) मधील उप-खंड (*दोन*), (*तीन*) आणि (*चार*) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता धारण करीत असतील; आणि

(*तीन*) ज्यांनी एकतर ,जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिकेमध्ये शिक्षक पदावर किमान ३ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेली असेल ;

अशा उमेदवारांमधून मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीमधून योग्य उमेदवारांच्या निवडीने ; किंवा

(क) (एक) जे जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिकांमधील शिक्षकांच्या एकत्रित सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीस पात्र असतील; आणि

(*दोन*) जे या नियमातील खंड (*अ*) मधील उप- खंड (*दोन*), (*तीन*) आणि (*चार*) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता धारण करीत असतील; आणि

(*तीन*) ज्यांनी एकतर जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिकेमध्ये किमान तीन वर्ष इतकी अखंड सेवा पूर्ण केलेली असेल ;

अशा उमेदवारांमधून योग्यतेच्या अधिन राहून जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिका शिक्षकांच्या एकत्रित सेवाजेष्ठतेच्या आधारे योग्य उमेदवारांमधून पदोन्नतीने नेमणूक करण्यात येईल.

(२) जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार नामनिर्देशनाने व निवडीद्वारे नेमणूका करण्यात येतील.

(३) नामनिर्देशनाने, निवडीद्वारे आणि पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकीचे प्रमाण अनुक्रमे ५०:२५:२५ असे राहिल.

२. ( भाग-दोन )

(*आय*) अनुक्रमांक-७-अ च्या नोंदीनंतर खालील नोंद समाविष्ट करण्यात येईल:-

| | | | |
|---|---|---|---|
| ७ ब | जिल्हा सेवा (वर्ग-तीन) ( दुय्यम शैक्षणिक) प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक | केंद्र प्रमुख | (*१*) (*अ*) (*एक*) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३६ वर्षापेक्षा अधिक नसेल; आणि<br>(*दोन*) ज्यांनी संबंधीत विषयामध्ये कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान ५०% गुणांसह पदवी धारण केली असेल, आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड अथवा समकक्ष पदवी धारण केली असेल; आणि<br>(*तीन*) ज्यांनी मान्यताप्राप्त संस्थेच्या एकतर प्राथमिक किंवा माध्यमिक विद्यालय किंवा उच्च माध्यमिक विद्यालय किंवा अध्यापक विद्यालय किंवा इतर कोणतेही महाविद्यालय |

यामध्ये सक्षम प्राधिका-याने मंजूरी दिलेल्या शासनमान्य पदावरील किमान ३ वर्षाचा अध्यापनाचा किंवा प्रशासनाचा अनुभव असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने;

(ब) (*एक*) जे या नियमातील खंड (*अ*) मधील उप-खंड (*दोन*) आणि (*तीन*) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असतील; आणि

(*दोन*) ज्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल, अशा शिक्षकांमधून विषयनिहाय मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षेव्दारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे पात्र उमेदवारांच्या निवडीने ;

(*क*) ज्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक ( प्राथगिक) या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा उमेदवारांमधून सेवाजेष्ठतेच्या आधारे पात्र उमेदवारांच्या पदोन्नतीने नेमणूक करण्यात येईल.

(२) जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार नामनिर्देशनाने आणि निवडीद्वारे नेमणूका करण्यात येतील.

(३) नामनिर्देशन, निवड आणि पदोन्नती याव्दारे करावयाच्या नेमणूकीचे प्रमाण ४०:३०:३० असे राहिल.

(४) (*एक*) एकूण मंजूर पदांपैकी भाषा, गणित व विज्ञान ,सामाजिक शास्त्रे (इतिहास , भूगोल ) या विषयांसाठी पदांची विभागणी समप्रमाणात राहील.

(*दोन*) या खंडाच्या उपखंड (*एक*) मध्ये नमूद केलेल्या विषयांसाठी भरतीचे प्रमाण खालील प्रमाणे राहील :-

(१) भाषा- (*एक*) इंग्रजी - ५० टक्के .
(*दोन*) प्रथम भाषा - गराठी , उर्दू इ. - ३० टक्के
(*तीन*) व्दितीय भाषा- हिंदी - २० टक्के

(२) गणित व विज्ञान- १०० टक्के

(३) सामाजिक शास्त्रे -इतिहास व भूगोल -१०० टक्के

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

( अ. ए. कुलकर्णी )
शासनाचे उप सचिव